**आयुष्मान भारत - मिशन महाराष्ट्र**
**समितीचे पुनर्गठन करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक आरोग्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः समिती-२०२३/प्र.क्र.३४३/आरोग्य-६**
गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल इमारत,
१० मजला, मंत्रालय, मुंबई - ४०० ००१
दिनांक: ०१ एप्रिल, २०२५

वाचा :

१) **सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांकः मफुयो-२०२३/प्र.क्र.१६०/आरोग्य-६, दिनांक २८ जुलै, २०२३**
२) **सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांकः समिती-२०२३/प्र.क्र.३४३/आरोग्य-६, दिनांक ०२ नोव्हेंबर, २०२३**

**प्रस्तावना :**

संदर्भाधीन क्रमांक १ चे शासन निर्णयान्वये केंद्र शासनाच्या आयुष्मान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व राज्य शासनाच्या महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना यांची एकत्रित अंमलबाजवणी करण्यास मान्यता दिलेली आहे. या योजनेंतर्गत राज्यातील सामान्य जनतेला आरोग्य सेवा लाभ करुन देणे हा महत्वाचा विषय आहे. सदर योजनेची राज्यात प्रभावीपणे अंमलबाजवणी करण्यासाठी संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयान्वये “आयुष्मान भारत- मिशन महाराष्ट्र” समितीचे गठन करण्यात आले होते. सदर योजनेचा वाढता विस्तार लक्षात घेता, संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेली समिती अधिक्रमित करुन आयुष्मान भारत - मिशन महाराष्ट्र समितीचे पुनर्गठन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय:

आयुष्मान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व राज्य शासनाची महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना एकत्रितपणे शासनाच्या दिनांक २८ जुलै, २०२३ च्या शासन निर्णयान्वये लागू करण्यात आलेली आहे. सदर योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी वाचा येथील संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेली समिती अधिक्रमित करुन पुढीलप्रमाणे “आयुष्मान भारत- मिशन महाराष्ट्र” समितीचे खालीलप्रमाणे पुनर्गठन करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नाम / पदनाम | पद |
|---|---|---|
| १ | डॉ.ओमप्रकाश सदाशिव शेटे | अध्यक्ष |
| २ | वैद्यकीय क्षेत्रातील/सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय काम करणारे | २ सदस्य |
| ३ | सहसंचालक (रुग्णालये), आरोग्य सेवा, मुंबई | सदस्य |
| ४ | सह संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई | सदस्य |
| ५ | सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा, राज्य आरोग्य हमी योजना, मुंबई | सदस्य |
| ६ | उपमुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी, मुंबई | सदस्य सचिव |

**२. सदर समितीची कार्यकक्षा पुढीलप्रमाणे राहील:-**

१) महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अंगीकृत रुग्णालयाची निकषानूसार सुसज्जता, सातत्याने नियतकालिक तपासणी व रुग्णालयामधून दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने निर्देश देणे. राज्यस्तरीय, विभागीय व जिल्हास्तरीय समित्यांकडून अहवाल मागविणे तसेच योजनेतंर्गत दिल्या जाणाऱ्या आरोग्य सेवेसंदर्भात आढावा घेणे व त्याअनुषंगाने करावयाच्या उपाययोजना विषयी शासनास शिफारस करणे.

२) सदर समितीने वेळोवेळी केलेल्या शिफारसी व बैठकांचे इतिवृत्त यांचा अभिलेख सदस्य सचिव यांनी जतन करावा.

३. आयुष्मान भारत- मिशन महाराष्ट्र समितीचे कार्यालय/दालन इत्यादींची व्यवस्था मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी, वरळी, मुंबई यांनी करावी.

४. समितीच्या अध्यक्षांना प्रचलित नियमानुसार अनुज्ञेय मानधन व सोईसुविधा देण्यात याव्यात.

५. संदर्भाधीन दिनांक २८ जुलै, २०२३ च्या शासन निर्णयातील तरतूदी कायम राहतील.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५०४०११७२८४८६८१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ASHOK MAROTI ATRAM

Digitally signed by ASHOK MAROTI ATRAM
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PUBLIC HEALTH DEPARTMENT,
2.5.4.20=e212845163abd708717bb4bef92b6886b147679a5af5a494e268689ab8d696dd, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=5F7ECA1F400D866EA34324CEA1A547AA04F0DA0794A00BEE126E8678172A15C5, cn=ASHOK MAROTI ATRAM
Date: 2025.04.01 17:45:18 +05'30'

**(अशोक आत्राम)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई
२) मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
३) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
४) मा. मुख्यमंत्री, यांचे अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
५) मा. मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६) मा. राज्यमंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई
८) अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई

९) प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
११) प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
१२) आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई -०१
१३) आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई -०१
१४) आयुक्त, राज्य कामगार योजना, मुंबई
१५) मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी, वरळी, मुंबई
१६) संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
१७) उपमुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी, मुंबई
१८) संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई
१९) सहाय्यक संचालक (आरोग्य सेवा), राज्य आरोग्य हमी सोसायटी, वरळी, मुंबई
२०) संचालक, वैद्यकिय शिक्षण विभाग, बृहन्मुंबई महानगरपालीका, मुंबई
२१) संचालक, वैद्यकिय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई
२२) अतिरीक्त आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालीका, मुंबई
२३) सहसंचालक (रुग्णालये-राज्यस्तर), आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई
२४) सहसंचालक (प्रशासन), वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई
२५) उपसंचालक, आरोग्य सेवा परिमंडळे (सर्व)
२६) सह सचिव / उप सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
२७) जिल्हाधिकारी (सर्व)
२८) जिल्हा शल्य चिकित्सक (सर्व)
२९) जिल्हा आरोग्य अधिकारी (सर्व)
३०) जिल्हा माहिती अधिकारी (सर्व)
३१) सर्व कार्यासने , सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
३२) निवड नस्ती.